# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४४** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २४७** **दिनांक :-२०/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१२/०३/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४३ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१२/०३/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४३ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१२/०३/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४३ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४४** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:- २४८** **दिनांक :-२०/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सार्व.बांधकाम विभाग/२१०४/२०२५ दि.१९/०३/२०२५
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.१८/०७/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०२/०८/२०२४ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.०३/०८/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ अंतर्गत ठिकठिकाणी आर.सी.सी. पाईप टाकणे कामी मक्तेदार श्री.जितेश गणेश ठाकरे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ११.००% कमीचे दर आल्याने सदर दरास व एकुण रक्कम रु.३९,५८,५४२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका मनपा निधी अंतर्गत प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ अंतर्गत ठिकठिकाणी आर.सी.सी. पाईप टाकणे कामास महासभा ठराव क्र.१५२ दि.०९/०८/२०२४ रोजीच्या मान्यतेने सदर कामाची ई निविदा सुचना मनपा सा.बा./जा.क्र./९९१ दि.२६/०८/२०२४ अन्वये प्रसिध्द केली असता संगणकाव्दारे निविदा भरणे करीता दिलेल्या मुदतीत एकुण ०६ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असुन प्राप्त ई निविदा कागदपत्रांची छाननी केली असता अ.नं.३ चे मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे, अ.नं.०४ चे मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे व अ.नं.०५ चे मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांना कागदपत्रे सादर करणे बाबत दि.२०/०९/२०२४ रोजी शॉट फॉल देण्यात आला त्यानूसार त्यांनी शॉट फॉलनुसार दि.२३/०९/२०२४ पर्यंत कागदपत्रे सादर केले नाही म्हणुन ते अपात्र ठरत आहे. अ.नं.०१, ०२, व ०३ यांचे दराबाबतचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.३७,५३,४१८/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.विवेक प्रभाकर खर्चे | निविदा रक्कमेवर २.५००% कमीचे दर | रु.३६,५९,५८२/- |
| २ | श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर ४.००% जास्तीचे दर | रु.३९,०३,५५४/- |
| ३ | श्री.जितेश गणेश ठाकरे | निविदा रक्कमेवर ११.००% कमीचे दर | रु.३३,४०,५४२/- |

वरील तुलनात्मक तकत्यानूसार मक्तेदार श्री.जितेश गणेश ठाकरे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ११.००% कमीचे दर आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.३३,४०,५४२/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ३३,४०,५४२/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ६,०१,२९७/- |
| ०३ | कामगार विमा ०.५% | १६,७०३/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ३९,५८,५४२/- |

वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.३९,५८,५४२/- मात्र आहे. मात्र सदरचा खर्च गटार व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षका खाली मंजुर झाले असल्याने सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार श्री.जितेश गणेश ठाकरे यांचे निविदा रक्कमेवर ११.००% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४४** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:- २४९** **दिनांक :-२०/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहा.आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./११६८/२०२४-२५ दि.१९/०३/२०२५
३. सहा.आयुक्त, आरोग्य विभाग यांचा दि.१९/०३/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.१९/०३/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१९/०३/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१९/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** ई-निविदा क्रं.०५/२०२५ नुसार ५ वर्ष कालावधी करिता... १.घंटागाडीव्दारे शहरातील दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा ओला व सुका विलगीकृत कचरा, रस्त्यावरील कचरा संकलित करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पर्यंत वाहतूक करणे २.शहरातील वार्डनिहाय दैनंदिन रस्ते, गटार, व्यापारी संकुले इ. साफ सफाई करीता ५०० कामगार पुरविणे कामी प्राप्त L१ निविदाधारक बी.व्ही.जी. इंडीया लि.पुणे यांचेशी करारनामा करुन कार्यादेश देणे बाबत निर्णय घेणे.

---

वाचा क्र.१ व सहा.आयुक्त, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

कार्यादेश क्रं. ३८२ दि.१४/०८/२०१९ नुसार वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स नाशिक यांना जळगांव शहरातील घनकचरा संकलन व वाहतूक करणे तसेच दैनंदिन साफ सफाई करिता ४०० कामगार पुरवठा करणे कामी ५ वर्षा (सन-२०१९-२४) करिता मक्ता देण्यात आलेला असून सदर मक्त्याची मुदत दि.१५/०८/२०२४ रोजी संपुष्टात आलेली असून पुढील ई-निविदा प्रक्रिया होई पावेतो महासभा प्रशासक ठराव क्रं. ११८ दि.१९/०७/२०२४ अन्वये इकडील जा.क्र. /४७७/२०२४ दि.०६/०८/२०२४ नुसार मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

महासभा प्रशासकिय ठराव क्रं.२१० दि.०९/१२/२०२४ अन्वये सन २०२५-२६ ते सन २०३१-३२ या ५ वर्ष कालावधी करिता घनकचरा संकलन व वाहतुक करणे तसेच कामगार पुरवठा करणे करिता खालील बाबी विचारात घेवून अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प (DPR) अहवालानुसार जळगांव शहराचे एकूण क्षेत्रफळ ६८.२४ स्के. कि.मी. असून शहरातील लोकसंख्या सन-२०२४ मध्ये ६,०४,०८२ असून मिळकतीची संख्या अदमासे १,२०,१६४ असून शहरात दैनंदिन निर्माण होणारा कचरा २८३.९१ मे.टन (४७० ग्रेम प्रती व्यक्ती) व एम.आय.डी.सी. भागातुन निघणारा दैनंदिन कचरा २० टन असे एकूण ३०४ टन दैनंदिन घनकचरा गृहीत धरण्यात आलेले आहे.

जळगांव शहरातील प्रभाग क्र. १ ते ४ अंतर्गत १९ वार्ड (अ,ब,क,ड) असून यापैकी ०९ वार्डांमध्ये दैनंदिन रस्ते व गटार साफ सफाई म.न.पा.च्या आस्थापनासूचीवरील ४३५ कायम कामगार व ४५ मोकादम यांचेमार्फत करण्यात येत आहे. तसेच उर्वरित १० वार्डामध्ये दैनंदिन रस्ते व गटार साफ सफाईचे कामासाठी निविदाधारक यांचेमार्फत ५०० कामगार पुरवठा करण्यात येणार असून असे एकूण- ९८० कामगारांकडून शहरातील दैनंदिन साफ सफाईचे काम करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

म.न.पा. मार्फत कचरा संकलन करणेसाठी पुरविण्यात येणारी वाहने तसेच L१ निविदाधारक यांनी स्वत: घ्यावयाची वाहनांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | आज रोजी कार्यान्वीत वाहने | सन-२०२४-२५ ते सन-२०३०-३१ साठी आवश्यक वाहने | मक्तेदार यांनी घ्यावयाची वाहने |
|---|---|---|---|---|
| १. | गॉर्बेज हॉपर | ८४ | १०५ | २१ |
| २. | कॉम्पॅक्टर मोठे | ७ | ९ | ० |
| ३. | कॉम्पॅक्टर मिनी | ० | ६ | ० |
| ४. | टिप्पर | ६ | ६ | ० |
| ५. | स्किपलोडर | ३ | ३ | ० |
| ६. | टाटा ४०७ पिकअप | ९ | ९ | ० |
| ७. | फ्रंट एन्ड लोडर | ४ | ४ | ० |
| एकूण- | - | ११३ | १४२ | २१ |

सध्यस्थितीत उपलब्ध वाहन संख्या व्यतिरिक्त सन-२०२५-२६ ते सन-२०३१-३२ या कालावधीसाठी लागणारी गॉर्बेज हॉपर (क्षमता ३.२ क्यु.मी.) २१ अतिरिक्त वाहने व ५० ढकलगाडी L१ निविदाधारकास स्वत: उपलब्ध करावी लागतील. म.न.पा. मार्फत मोठे कॉम्पॅक्टर- २ नग (क्षमता १४ क्यु.मी.) व मिनी कॉम्पॅक्टर- ६ नग (क्षमता ७ क्यु.मी.) खरेदी प्रक्रिया प्रस्तावित असुन सदरची वाहने म.न.पा.तर्फे खरेदी केल्यानंतर भविष्यात L१ निविदाकाराला कचरा संकलन करणे करिता विनामुल्य पुरविण्यात येणार आहेत. तो पावेतो L१ निविदाकाराने पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

१. घंटागाडीद्वारे शहरातील दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा ओला व सुका विलगीकृत कचरा, रस्त्यावरील कचरा संकलित करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पर्यंत वाहतूक करणे २. शहरातील वार्डनिहाय दैनंदिन रस्ते, गटार, व्यापारी संकुले इ. साफ सफाई करीता ५०० कामगार पुरविणे कामी ई-निविदा प्रपत्राचा मसूदा म.न.पा. प्रशासनाने गठीत केलेल्या निविदा समिती सखोल व सविस्तर चर्चेअंती निविदा मसूदेतील अटी शर्ती प्रमाणीत केल्यानंतर शासन निर्णयनुसार ई-निविदा सुचना क्रं. ०५ दि.१२/१२/२०२४ नुसार राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरावरील दैनिक वृत्तपत्रात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर www.mahaetenders.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली होती.

आयुक्त यांचे दालनात दि.२४/१२/२०२४ रोजी झालेल्या निविदापुर्व बैठकीत (Pri bid meeting) ईच्छुक निविदाकारानी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर म.न.पा. हिताचा विचार करता स्पर्धात्मक निविदा प्राप्त होणेसाठी निविदेतील काही जाचक अटी शिथील व दुरुस्त्या करुन आयुक्त यांचे मान्यतेने शुध्दीपत्रक (Corrigendum) संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते.

विहित केलेल्या मुदतीत संकेतस्थळावर ३ ई-निविदा प्राप्त झालेल्या असून निविदाकारांचा तांत्रिक लिफाफा क्रं. १ दि.२४/०१/२०२५ रोजी निविदा समिती समोर उघडून उक्त कामांच्या प्राप्त ३ ई-निविदा मधील कागदपत्रांची निविदा समितीने छाननी केली असता १. Watergrace Product, Nashik २. BVG INDIA LTD. Pune ३. Global Waste Management Cell Pvt.Ltd., Mumbai यांनी सादर केलेल्या दस्तऐवजाच्या आधारे निविदा समितीच्या अहवालानुसार तीनही निविदा पात्र ठरविण्यात आल्या होत्या.

त्या अनुषंगाने प्राप्त तीनही निविदाकार यांचे आर्थिक दरांचा लिफाफा क्रं. २ निविदा समितीच्या शिफारशीने व आयुक्त यांचे मान्यतेने दि.२८/०१/२०२५ रोजी उघडून प्राप्त निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता पहाता ई-निविदा क्रं. ०५ मधील L१ निविदाकार बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे यांचे प्राप्त स्पर्धात्मक सर्वात कमीचे / न्युनतम दर प्राप्त झालेले आहेत.

तथापी प्रशासनास सदरचे दर जास्तीचे वाटत असल्याने दराचे विश्लेषण / वाटाघाटी करणे कामी दि.०४/०३/२०२५ रोजी आयुक्त यांचे दालनात ई-निविदा समितीच्या समक्ष झालेल्या चर्चेनुसार वाटाघाटीअंती L१ निविदाकार बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे यांनी १. घराघरातून निघणारा ओला व सुका विलगीकृत कचरा संकलन व वाहतूक करणे कामी टिपींग फी दर रु.१४९० प्रती मे. टन ऐवजी रु.१४४०/- प्रती मे. टन तसेच २. शहरातील दैनंदिन रस्ते, गटार साफ सफाई करणे कामी सफाई कामगारांना अदा करावयाच्या वेतना पोटी म.न.पा. तर्फे मक्तेदारास दयावयाचे किमान वेतन दर रु.८७७/- प्रती कामगार प्रती दिन यावर निविदाकार यांचे सेवाशुल्क रु.७१.६०/- प्रती कामगार प्रती दिन ऐवजी रु.७१.००/- दर कमी करुन काम करणेस सहमती दर्शविलेली असून दि.०४/०३/२०२५ अन्वये लेखी स्वरुपात म.न.पा.स पत्र सादर केलेले असुन सोबत (Rate Analysis) दर विश्लेषण देखील सादर केलेले आहे.

शहरातील १९ (अ/ब/क/ड) वार्डातील १००% दैनंदिन साफ सफाईचे उद्दिष्ट असून शास्त्रोक्त पध्दतीने घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ नुसार प्रस्तावीत निविदेतील अटी शर्तीनुसार अंमलबजावणी करणे कामी येणाऱ्या खर्चास महासभा प्रशासकिय ठराव क्रं.२१० दि.०९/१२/२०२४ अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने अंदाजपत्रक रक्कम रु.१५८.५९ कोटी (अ रु.७४.८० कोटी ब रु.८३.७९ कोटी) खर्च प्रस्तावीत करणेत आलेला होता.

तथापी ई-निविदेमध्ये कामगारांना देय असलेली लेव्हीमध्ये ई.एस.आय.सी. १.२५% नमुद करण्यात आलेली होती. परंतु दि.२४/१२/२०२४ रोजी झालेल्या निविदापुर्व बैठकीत इच्छूक निविदाधारक यांनी ई.एस.आय.सी. १.२५% ऐवजी ३.२५% असलेबाबतचा आक्षेप नोंदविला होता.

त्याअनुषंगाने ई-निविदा समितीच्या मान्यतेने प्रसिद्ध करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकामध्ये लेव्हीमध्ये ई.एस.आय.सी. ३.२५% दुरुस्ती करण्यात आलेला आहे. त्यानुसार सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.१५९.६७ कोटी (अ रु.७३.८० कोटी ब रु.८४.८७ कोटी) खर्च अपेक्षीत असून L१ निविदाकार बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती त्यांनी सादर केलेल्या दरानुसार खालील प्रमाणे येणाऱ्या खर्चास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

| कामाचे नांव | दर | प्रतीमहा खर्च | प्रती वर्ष खर्च | ५ वर्ष कालावधीचा खर्च |
|---|---|---|---|---|
| अ) घराघरातून निघणारा ओला व सुका विलगीकृत घनकचरा संकलन व वाहतूक करणे. (३०४ मे. टन प्रती दिन) | रु.१४४०/- प्रती टन | रु.१.३१ कोटी | रु.१५.७५ कोटी | रु.७८.७९ कोटी |
| ब) शहरातील दैनंदिन रस्ते व गटारी साफ सफाई करणे करीता ५०० कामगार पुरवठा करणे. (रु.८७७/- + रु.७१/- = रु.९४८/- प्रती कामगार प्रतिदिन) | रु.९४८/- प्रती कामगार प्रती दिन | रु.१.४२ कोटी | रु.१७.०६ कोटी | रु.८५.३२ कोटी |
| एकूण- | | रु.२.७३ कोटी | रु.३२.८२ कोटी | रु.१६४.११ कोटी |

अ) घंटागाडीद्वारे शहरातील वार्ड निहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा संकलन व प्रकल्पापर्यंत वाहतूक करणे कामी ५ वर्ष कालावधी करीता L१ निविदाकार बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे यांचे वाटाघाटीअंती टिपींग फी दर रक्कम रु.१४४० प्रती टन प्रमाणे रक्कम रु.७८ कोटी ७९ लक्ष खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्चाची तुलना सुधारित अंदाजपत्रकिय खर्च रक्कम रु.७४ कोटी ८० लक्ष कोटीशी केली असता रक्कम रु.३.९९ कोटी (प्रतीमहा रु.६ लक्ष ६५ हजार) वाढीव खर्च अपेक्षीत आहे.

ब) मक्तेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने शहरातील वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार, व्यापारी संकुले इ. साफ सफाई करणे करीता बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे L१ निविदाकारातर्फे कंत्राटी पध्दतीने ५०० कामगार पुरवठा करणे कामी म.न.पा. तर्फे दयावयाचे किमान वेतन दर रु.८७७/- प्रती कामगार प्रती दिन दरावर वाटाघाटीअंती निविदाकाराचे प्राप्त सेवाशुल्क निविदा दर रु.७१/- असे एकूण रु.९४८/- प्रती कामगार प्रती दिन प्रमाणे ५ वर्ष कालावधी करीता रक्कम रु.८५ कोटी ३२ लक्ष खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्चाची तुलना सुधारित अंदाजपत्रकिय रक्कम रु.८४ कोटी ८७ लक्ष मात्रशी केली असता रक्कम रु.४५ लक्ष (प्रतीमहा रु.७५ हजार) पेक्षा जास्तीचा वाढीव खर्च अपेक्षीत आहे.

तरी खालील अ.क्र. १ ते ७ बाबींना मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**१.** L१ निविदाकार यांचेशी करारनामा करुन कार्यादेश देणेपुर्वी शहरातील दैनंदिन साफ सफाई व कचरा संकलन व वाहतूक तसेच साफ सफाई करणेकामी ४०० कामगार पुरवठा करणेकामी सध्यस्थितीत कार्यरत असलेले मक्तेदार वॉटरग्रेस प्रॉडक्टस, नाशिक यांना मक्ता रद्द करणेबाबत पुर्वसूचना पत्र देणे आवश्यक आहे.

**२.** वरील प्रमाणे ५ वर्ष कालावधी करीता चालू दराने सुधारित अंदाजपत्रकिय खर्च अ) रु.७४ कोटी ८० लक्ष + ब) रु.८४ कोटी ८७ लक्ष असा एकूण रक्कम रु.१५९ कोटी ६७ लक्ष खर्च प्रस्तावीत होता. तथापी L१ निविदाकार बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे यांचेशी वाटाघाटीअंती प्राप्त झालेल्या निविदा दरांशी तुलना केली असता अ) रु.७९.७९ कोटी + ब) रु.८५.३२ कोटी असा एकूण रक्कम रु.१६४.११ कोटी खर्च येणार असून अंदाजपत्रकापेक्षा रु.४.४४ कोटी जास्तीचा खर्च अपेक्षीत आहे.

**३.** अ) शहर हद्दीतील घराघरातून घनकचरा संकलन व वाहतूक करीता L१ निविदाकार यांचे प्राप्त झालेले टिपींग फी दर रक्कम रु.१४४०/- प्रती टन तसेच ब) शहरातील दैनंदिन रस्ते, गटारी साफ सफाई करणे करीता ५०० कामगार पुरवठा करणे कामी L१ निविदाकार यांना म.न.पा.तर्फे दयावयाचे किमान वेतन दर रु.८७७/- प्रती कामगार प्रती दिन या दरावर निविदाकाराचे प्राप्त सेवाशुल्क निविदा दर रु.७१/- असे एकूण रु.९४८/- मात्रला मान्यता घेणे आवश्यक आहे.

**४.** निविदेतील अटी शर्तीनुसार एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर दुसऱ्या वर्षापासून ५% नैसर्गिक वाढ विचारात घेवून L१ निविदाकार यांचे प्राप्त दरांपैकी कामगारांचा पुरवण्याच्या सेवाशुल्क वगळून कचरा वाहतूक टिपींग फीवर ५% दरवाढ दरवर्षी महापालिकेतर्फे देणे क्रमप्राप्त असल्याने त्या अनुषंगाने ५ वर्षासाठी येणाऱ्या व वाढीव होणाऱ्या घनकचरा संकलनाच्या परिमाणांमुळे येणारा वाढीव खर्चास मान्यता मिळावी.

**५.** निविदेतील अटी शर्ती नुसार शासनाच्या किमान वेतन अधिनियम १९४८ प्रमाणे कामगारांचे किमान वेतन दरात वेळोवेळी होणारे बदल L१ निविदाकार यांना अनुज्ञेय असून त्या अनुषंगाने येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळावी.

**६.** L१ निविदाकार यांचेमार्फत निविदेतील मंजूर दरात कार्यादेश कालावधीत प्रसंगी आवश्यकता भासल्यास साफ सफाई करीता वेळोवेळी अतिरिक्त कामगार पुरवठा करणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळावी.

**७.** ५ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च १५ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून तसेच घनकचरा व्यवस्थापन म.न.पा. स्वनिधीतुन करणेस मान्यता मिळावी.

प्रस्तावीत केलेनुसार वरील प्रमाणे अ.क्र. १ ते ७ बाबींकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ संविधा ७३ (क) नुसार L१ निविदाकार बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे यांचेशी मे. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल असलेली याचिका क्रं. ३०७९/२०२५ व २१८३ /२०२५ च्या अधीन राहून अटी शर्तीसह संविदा करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेसाठी सहा.आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार तसेच मे.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल असलेल्या याचिकेच्या निर्णयास अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत तसेच कोणतीही कायदेशीर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४४** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:- २५०** **दिनांक :-२०/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. मुख्य लेखापरिक्षक यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सा.अहवाल/मुलेप/४८/२०२५ दि.१८/०३/२०२५

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) (अ) अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०२/१२/२०२४ ते दि.३१/०१/२०२५ (एकूण - ०९ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) (अ) अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०२/१२/२०२४ ते दि.३१/०१/२०२५ (एकूण - ०९ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल मुख्य लेखापरिक्षक विभागाने माहीतीसाठी सादर केलेला आहे.

उपरोक्त वाचा क्र.१,२ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार लेखा लेखापरिक्षण विभागाने सादर केलेल्या लेखा तपासणी कामाच्या अहवालाची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**